# महिला कला—वाणिज्य महाविदयालय चांदुर (रेल्वे)

# राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर

# दत्तक ग्राम— बागापूर तालुका— चांदुर रेल्वे

# दिनांक २६/०२/२०२३ ते ०५/०३/२०२३

## अहवाल

............................................................................................................

विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित महिला कला—वाणिज्य महाविदयालय चांदुर—रेल्वे येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दिनांक २६/०२/२०२३ ते ०५/०३/२०२३ या कालावधीत दत्तक ग्राम बागापूर, येथील संत खप्ती महाराज आश्रम येथे संपन्न झाले. या विशेष शिबिराचा अहवाल पुढील प्रमाणे:

१. **रविवार, दिनांक २६/०२/२०२३** रोजी महाविदयालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरार्थीची नोंदणी, शिबिराची पूर्वतयारी करण्यात आली. सायंकाळच्या सत्रामध्ये गावकयांशी चर्चा करण्यात आली. शिबिरार्थी व गावकरी यांचा परिचय झाला.

२. **सोमवार, दिनांक २७/०२/२०२३** रोजी राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचे उदघाटन महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी उद्घाटक म्हणून सन्माननीय श्री. निरंजन चौधरी अध्यक्ष संत खप्ती महाराज आश्रम बागापूर, प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच सौ. संचिता बोंद्रे, यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. यावेळी गावातील प्रतिष्ठित मंडळी व महाविदयालयातील सर्व प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

३. **मंगळवार, दिनांक २८/०२/२०२३** ला प्रार्थना, योगा, प्रभातफेरी, ग्राम स्वच्छता, श्रमदान, या दिनचर्येनंतर बौदिधक सत्रामध्ये दुपारी २.००वाजता 'भरड धान्याचे (मिलेट) महत्व' या विषयावर डॉ. अतुल वानखडे यांनी मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष डॉ. प्रदीप दंदे हे होते. या बौदिधक सत्राला शिबिरार्थी व गावातील महिला उपस्थित होत्या.

४. **बुधवार, दिनांक ०१/०३/२०२३** ला प्रार्थना, योगा, प्रभातफेरी, ग्राम स्वच्छता, पथनाटयाद्वारे 'मोबाईलचे दुष्परिणाम' या विषयावर जनजागृती करण्यात आली. दिनचर्येनंतर गटचर्चा घेण्यात आली. तसेच बौदिधक सत्रात दुपारी २.००वाजता 'ग्रामविकासात युवकांचे योगदान व भूमिका' विषयावर श्री. बडूभाऊ आंबटकर, संयोजक ग्रामसेवा लोक अभियान विदर्भ यांनी मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष डॉ. गजानन वेले हे होते. या सत्रात शिबिरार्थ्यासोबत गावातील शालेय विदयार्थी उपस्थित होते.

५. **गुरूवार, दिनांक ०२/०३/२०२३** ला प्रार्थना, योगा, प्रभातफेरी, ग्राम स्वच्छता, पथनाटयाद्वारे 'व्यसनमुक्तीवर' जनजागृती करण्यात आली. दिनचर्येनंतर गटचर्चा घेण्यात आली. बौदिधक सत्रात दुपारी २.००वाजता 'आरोग्य विषयक सल्ला' या विषयावर डॉ. सुषमा खंडार, स्त्रीरोग तज्ञ यांनी मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष प्रा. संजीव भुयार हे होते. रात्री 'आकाश निरीक्षण' हा कार्यक्रम भूगोल विभागाच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. यात शिबिरार्थी व गावातील शालेय विदयार्थी सहभागी झाले होते.

६. **शुक्रवार, दिनांक ०३/०३/२०२३** ला प्रार्थना, योगा, प्रभातफेरी, ग्राम स्वच्छता, पथनाटयाद्वारे 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या विषयावर जनजागृती करण्यात आली. दिनचर्येनंतर गटचर्चा घेण्यात आली बौदिधक सत्रात दुपारी २.००वाजता 'आत्मसंरक्षण' (कराटे प्रशिक्षण) विषयावर सेंन्साई संदीप देशमुख यांनी मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष डॉ. विजय कापसे हे होते. या सत्रात शिबिरार्थी व गावातील शालेय विदयार्थी सहभागी झाले होते.

७. **शनिवार, दिनांक ०४/०३/२०२३** ला प्रार्थना, योगा, प्रभातफेरी, ग्राम स्वच्छता, पथनाटयाद्वारे 'अंधश्रद्धा निर्मूलन' या विषयावर जनजागृती करण्यात आली. या दिनचर्येनंतर गटचर्चा घेण्यात आली. बौदिधक सत्रात दुपारी २.००वाजता 'महिला मेळावा' आयोजित करण्यात आला होता. त्यात 'आहार विषयक मार्गदर्शन व महिला सक्षमीकरणाची गरज' या विषयावर डॉ. मीनाक्षी भादंककर यांनी मार्गदर्शन केले. या सत्राच्या अध्यक्ष डॉ. सीमा जगताप हया होत्या. या सत्रात शिबिरार्थी व गावातील महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या. या नंतर समारोपीय कार्यक्रमाची सुरूवात झाली. समारोपीय कार्यक्रमाची पूर्वतयारी करण्यात आली. दुपारी ४.००वाजता समारोपीय समारोह संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. निरंजन चौधरी, अध्यक्ष संत खप्ती महाराज आश्रम बागापुर व गावातील प्रतिष्ठित मंडळी तसेच महाविदयालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

८. **रविवार, दिनांक ०५/०३/२०२३** ग्रामस्थांशी चर्चा करून निरोप घेण्यात आला.

| | |
|---|---|
| कार्यक्रम अधिकारी | प्राचार्य |
| (प्रा. अनिता एस. धुर्वे) | (डॉ. अशोक पळवेकर) |

..................................

# विशेष शिबिर कार्यक्रम फोटो

## राष्ट्रीय सेवा योजना शिबिर उद्घाटन कार्यक्रम






पथनाटयाच्या माध्यमातून जनजागृती करतांना रोसेयो स्वयंसेवक




ग्राम स्वच्छता करतांना रोसेयो स्वयंसेवक




**बौदिधक सत्र 'ग्रामविकासात युवकांचे योगदान व भूमिका' विषयावर श्री.बडूभाऊ आंबटकर, संयोजक ग्रामसेवा लोक अभियान विदर्भ मार्गदर्शन करतांना**





रासेयो स्वयंसेवकांना योग मार्गदर्शन करतांना




निरंक्षरांना साक्षर करतांनां रोसेयो स्वयंसेवक



'आकाश निरीक्षण' कार्यक्रम भूगोल विभागाच्यावतीन प्रा. संजीव भुयार सर




'आत्मसंरक्षण' (कराटे प्रशिक्षण) विषयावर सेंन्साई संदीप देशमुख मार्गदर्शन करतांना






रोसेयो विशेष शिबिराचे समारोपीय कार्यक्रम


संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित
विदर्भ युथ वेलफेयर सोसायटी, जि. अमरावती व्दारा संचालित
महिला कला-वाणिज्य महाविद्यालय
चांदुर (रेल्वे), जि. अमरावती
राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारा आयोजित
विशेष श्रमसंस्कार शिबिर
॥ आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष - २०२३ ॥


महिला कला-वाणिज्य महाविद्यालय

पुण्य नगरी

# बागापूर येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर

**पुण्य नगरी** / तालुका प्रतिनिधी



**चांदूर रेल्वे :** महिला कला वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीराचे आयोजन दत्तक ग्राम श्री संत खप्ती महाराज आश्रम बागापूर येथे नुकतेच पार पडले.

यावेळी संत खप्ती महाराज आश्रमाचे निरंजन चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मागदर्शन केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ अशोक पळवेकर तर उद्घाटन म्हणून निरंजन चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून ग्राम बागापूर येथील उपसरपंच सुचिता बोद्रे, डॉ विजय कापसे, डॉ गजानन वेले, डॉ प्रदीप दंदे, डॉ सीमा जगताप, प्रा संजीव भुयार, प्रा अतुल वानखेडे, प्रा नितीन अंभोरे, प्रा रश्मी खेडकर, प्रा नीलिमा टिचुकले, प्रा देवश्री शेळके उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्तविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा अनिता एस धुर्वे यांनी केले. सूत्रसंचालन रासेयो स्वयंसेवक संजना मस्के, आभार पौर्णिमा वाहने हिने केले. या कार्यक्रमास गावकरी व रासेयो स्वयंसेवक प्रतिनिधी पौर्णिमा वाहने तसेच रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते. या सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिरात प्रार्थना, योगासन, प्रभातफेरी, ग्राम स्वच्छता, पथनाट्य, बौद्धिक व्याख्यान, आरोग्यविषयक मार्गदर्शन, महिला मेळावा, प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

# बागापूर : रासेयो विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्‌घाटन



चांदूर रेल्वे दि. २ : चांदुर-रेल्वे येथील महिला कला-वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या दि. २६ फेब्रुवारी, २०२३ ते ५ मार्च, २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा उद्घाटन समारंभ दि. २७ फेब्रुवारी रोजी पार पडला.

बागापूर येथील श्री संत खप्ती महाराज आश्रमाचे अध्यक्ष मा. निरंजनजी चौधरी यांच्या हस्ते या समारंभाचे उद्घाटन करण्यात आले, तर समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर हे होते. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिता धुर्वे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. बागापूर ग्रामपंचायतच्या उपसरपंच मा. सौ. सुचिता बोंद्रे, डॉ. गजानन वेले, डॉ. सीमा जगताप, डॉ. विजय कापसे, संजय धुर्वे यांनी आपले विचार मांडले. यावेळी महाविद्यालयातील प्रा. प्रदीप दंदे, प्रा. संजीव भुयार, प्रा. अतुल वानखडे, प्रा. नितीन अंभोरे, प्रा. रश्मी खेडकर, प्रा. मृणाली वानखडे, प्रा. नीलिमा टिचुकले, कु. देवश्री शेळके यांच्यासह रेखा मेश्राम आणि अनिल शास्त्रकार हे शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजना मस्के यांनी तर आभारप्रदर्शन पौर्णिमा वहाणे यांनी केले.

# बागापूर : रासेयो शिबिरात 'कविता कुसुमाग्रजांच्या' या कार्यक्रमाचे आयोजन




चांदुर-रेल्वे दि. ८ : येथील महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्यावतीने दि. २६ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीत बागापूर येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या उद्घाटन सोहळ्यानंतर रात्री सांस्कृतिक कार्यक्रमाअंतर्गत २७ फेब्रुवारी या कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी 'मराठी भाषा गौरव दिना'चे औचित्य साधून 'कविता कुसुमाग्रजांच्या' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात डॉ. अतुल वानखडे यांनी कवी कुसुमाग्रजांच्या काही निवडक कवितांचे अभिवाचन केले.

कवितांचे अभिवाचन करण्यापूर्वी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना 'मराठी भाषा गौरव दिन' हा कुसुमाग्रजांच्या जन्मदिवशी (२७ फेब्रुवारी) साजरा करण्यात येतो. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा अशी समस्त मराठीजनांची मागणी आहे. माय मराठीचा प्रत्येकाला सार्थ अभिमान आहे. खरंतर, मराठी भाषेचा उगम हा उत्तरेकडे झाला असून साधारणतः दीड हजार वर्षांचा इतिहास जपणारी ही भाषा आहे. भारताच्या दक्षिण भागामध्ये ती प्रामुख्याने विकसित झाली. मराठी भाषेचा पूर्ववैदिक, वैदिक, संस्कृत, पाली, प्राकृत, अपभ्रंश असा उत्क्रांत होत गेला असून आता मराठी भाषा एका वेगळ्याच टप्प्यावर येऊन पोहचली आहे. काळाप्रमाणे आणि स्थळानुसारही ही भाषा बदलत गेली आहे. मराठी बोली आणि मराठी प्रमाणभाषा असे या भाषेचे दोन भाग आहेत, असेही डॉ. वानखडे यांनी यावेळी सांगितले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, कवी कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. मराठी भाषा ही ज्ञानभाषा व्हावी यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. आपल्या मातृभाषेचा गौरव आणि कुसुमाग्रज यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणूनच त्यांचा जन्मदिवस हा 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून गौरविण्याचा आणि साजरा करण्याचा निर्णय २१ जानेवारी २०१३ रोजी घेण्यात आला आणि तेव्हापासूनच हा दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

या कार्यक्रमाला शिबिरार्थी विद्यार्थिनी, कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिता धुर्वे, प्रा. संजीव भुयार, डॉ. प्रदीप दंदे, डॉ. गजानन वेले, प्रा. नितीन अंभोरे आणि ग्रामस्थ प्रामुख्याने उपस्थित होते.

# चांदुर-रेल्वे येथील महिला महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराचा समारोप



चांदुर-रेल्वे दि. ५ : विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित येथील महिला कला-वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या रविवार, दि. २६ फेब्रुवारी ते रविवार, दि.५ मार्च २०२३ या कालावधीत दत्तकग्राम बागापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप नुकताच पार पडला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर हे होते.

या सात दिवसीय शिबिराच्या नियोजित कार्यक्रमानुसार रविवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी शिबिरार्थींचे दुपारी दोन वाजता बागापूर येथे आगमन झाल्यानंतर शिबिराची पूर्वतयारी, परिसर स्वच्छता व गावकऱ्यांशी चर्चा करण्यात आली. दुसऱ्या दिवशी प्राचार्य डॉ अशोक पळवेकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपसरपंच सौ. सुचिता बोंद्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत मा. निरंजनजी चौधरी यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर इतर दिवशीच्या नियमित कार्यक्रमांत प्रार्थना, प्राणायाम व योगाभ्यास, श्रमदान, बौद्धिक सत्र आणि सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी उपक्रम राबविण्यात आले.

२०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' असल्याने या शिबिराच्या बौद्धिक सत्रात सत्राचे अध्यक्ष डॉ. प्रदीप दंदे आणि वक्ते डॉ. अतुल वानखडे यांनी 'भरड धान्याचे (मिलेट) महत्त्व' शिबिरार्थींना समजावून सांगितले; आणि महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागाच्यावतीने प्रकाशित करण्यात आलेल्या याच विषयावरील 'लोकराज्य'च्या अंकाचे उपस्थितांमध्ये वितरणही करण्यात आले. तसेच इतर बौद्धिक सत्रांमध्ये डॉ. गजानन वेले यांच्या अध्यक्षतेखाली 'ग्रामविकासात युवकांचे योगदान व भूमिका' या विषयावर बंडूभाऊ आंबटकर यांनी विचार मांडले. डॉ. सुषमा खंडार यांनी उपस्थित शिबिरार्थींना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. संजीव भुयार होते. नंतरच्या सत्रात प्रा. संजीव भुयार आणि प्रा. नितीन अंभोरे यांच्या मार्गदर्शनाखाली रात्री 'आकाश निरक्षण' हाही कार्यक्रम घेण्यात आला. 'मुलींसाठी स्वसंरक्षणाची गरज' लक्षात घेऊन सेन्साई संदीप देशमुख यांनी शिबिरार्थींना कराटे प्रशिक्षण दिले. या सत्राचे अध्यक्ष डॉ. विजय कापसे होते. तर गावातील महिलांना आहारविषयक मार्गदर्शन करण्यासाठी तसेच महिला सक्षमीकरणाची आवश्यकता प्रतिपादन करण्यासाठी डॉ. सीमा जगताप यांच्या अध्यक्षतेखाली एका 'महिला मेळाव्या'चेही आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात रश्मी खेडकर, नीलिमा टिचुकले, मृणाली वानखेडे, अश्विनी बनकर, प्रियंका राऊत यांचा सहभाग होता.

शिबिराचा समारोप समारंभ पार पडल्यानंतर शेवटच्या दिवशी शिबिरार्थींनी ग्रामस्थांशी चर्चा करून त्यांचा निरोप घेतला.

या शिबिराच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर, राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिता धुर्वे, रासेयो समिती सदस्य डॉ. प्रदीप दंदे यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो गटप्रमुख पौर्णिमा वहाणे, स्वाती खडसे, प्रा. संजीव भुयार, डॉ. अतुल वानखडे, प्रा. नितीन अंभोरे यांनी बरेच परिश्रम घेतले. तसेच डॉ. विजय कापसे, डॉ. सीमा जगताप, प्रा. रश्मी खेडकर, प्रा. नीलिमा टिचुकले, प्रा. मृणाली वानखडे, देवश्री शेळके, प्रा. अश्विनी बनकर, प्रियंका राऊत यांच्यासह संदीप झोडे, अनिल शास्त्रकार, रेखा मेश्राम, रजनी वघवे, अशोक गव्हाळे यांचेही सहकार्य लाभले.

या सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप समारंभात बागापूर येथील श्री संत खप्ती महाराज आश्रमाचे अध्यक्ष निरंजनजी चौधरी, विश्वस्त आबासाहेब भोगे, नरेंद्रजी मोर आणि गंगाधरजी बावणे तसेच व्यवस्थापक वासनिक, सरपंच सौ. प्रियंका चौधरी, उपसरपंच सौ. सुचिता बोंद्रे, पोलिस पाटील दिनेश चौधरी, ग्रामस्थ सुरेशजी चौधरी आणि आश्रम परिसरातील व समस्त गावकरी मंडळी यांनी शिबिराच्या आयोजनासाठी केलेल्या मौलिक सहकार्याबद्दल त्यांचे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्यावतीने यावेळी मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

# राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात आत्मसंरक्षणाचे धडे

ता.प्रतिनिधी/६ मार्च

**चांदुर रेल्वे-** विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित महिला कला वाणिज्य महाविद्यालय चांदुर रेल्वे च्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर दत्तक ग्राम श्री संत खसी महाराज आश्रम बागापूर येथे सुरू आहे. शिबिरात दररोज बौद्धिक सत्राचे आयोजन करण्यात येत आहे.

आपण पाहतो काही समाज विघातक लोकांकडून महाविद्यालयीन मुलींवर अनेक प्रकारचे अत्याचार होतात. त्यांच्या पासून स्वत:चे रक्षण कसे करता येईल याचे प्रशिक्षण प्रत्येक विद्यार्थीनींनी घेणे आवश्यक आहे. त्याचाच एक भाग म्हणून रासेयो शिबिरात मार्गदर्शक शोतोकॉन कराटे- डो



असोसिएशनचे (अमरावती) मुख्य प्रशिक्षक संदीप देशमुख यांनी सर्व रासेयो स्वयंसेवकांना आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ विजय कापसे तर प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त कर्मचारी गाडेकर, प्रा. मृणाली वानखेडे हे होते. डॉ विजय कापसे यांनी अध्यक्षीय भाषणातून या विषयावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे प्रास्तविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा अनिता एस धुर्वे यांनी केले. सूत्रसंचालन रासेयो स्वयंसेवक कु वैष्णवी लांडगे आभार कु भाग्यश्री जाधव हिने केले. या कार्यक्रमास गावकरी व रासेयो स्वयंसेवक प्रतिनिधी कु पौर्णिमा वाहने तसेच रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते. या शिबिराची सांगता दि. 5 मार्च 2023 ला होणार आहे.